# गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना

| अ. क्र. | योजना | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | **गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना** |
| २ | योजने बद्दलचा शासन निर्णय | शिक्षण क्रीडा व समाजकल्याण विभाग, शा.नि. क्र. एससीएच/२२७०/८५६४१-एस, दिनांक २१ जुन, १९७१. |
| ३ | योजनेचा प्रकार/स्वरुप | सदर योजनेसाठी राज्याकरिता गणित विषयासाठी ५० व भौतिकशास्त्र विषयासाठी ५० असे एकूण १०० संच राज्यस्तरावर मंजूर आहे. सदर संचाची विभागणी विद्यापीठनिहाय करण्यात येते. |
| ४ | योजनेचा उद्देश | राज्यातील गणित व भौतिकशास्त्र विषयात इ. १२ वीत विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सदर शिष्यवृत्ती दिली जाते. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी ही योजना लागू आहे. |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. विज्ञान शाखेच्या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतेलेले व गणित किंवा भौतिकशास्त्र हा प्रमुख विषय घेणारे विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करण्यास्तव पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीस्तव अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस इ. १२ वीच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण प्राप्त असणे आवश्यक आहे.<br>३. विद्यार्थ्यांचा अर्ज संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना संबंधित महाविद्यालयामार्फत ३० सप्टेंबर पूर्वी पोहोचणे आवश्यक आहे. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | १. बारावीची परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्राची छायांकित प्रत.<br>२. बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत. |
| ८ | दिल्या जाणाया लाभाचे स्वरुप | नवीन मंजूरीस्तव अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस शा.नि.०५.०२.२००४ प्रमाणे प्रति माह १०० प्रमाणे रक्कम रु. १०००/- तथापि, नुतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रति माह १०० प्रमाणे रक्कम रु. १२००/- (योजनेच्या नवीन मंजूरीची कार्यवाही उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे करण्यात येते व नुतनीकरण महाविद्यालयाशी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत करण्यात येते.) |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | उच्च शिक्षण संचालनालयामार्फत त्यांचे अधिनस्त सर्व महाविद्यालयास/अकृषि विद्यापीठांस माहे जुलै मध्ये परिपत्रकाद्धारे सदर योजनेचा माहिती, अर्ज करण्याची प्रक्रिया/अर्जाचा नमुना पाठविण्यात येतो. विद्यार्थ्यांनी त्यांचा अर्ज ऑफलाईन पध्दतीने आवश्यक सहपत्रांसह विद्यापीठांमार्फत उच्च शिक्षण संचालनालयास ३० सप्टेंबर पुर्वी सादर करणे आवश्यक आहे. |
| १० | अंदाजे प्रक्रियेला लागणारा वेळ | अर्ज भरण्याची प्रक्रिया साधारणपणे माहे जुलै मध्ये सुरु होते. सदर अर्जाची विविध स्तरांवरील छाननी होऊन शिष्यवृत्तीची रक्कम माहे फेब्रुवारी - मार्च मध्ये विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेद्धारे महाविद्यालयास/विद्यार्थ्यांस वितरीत होते.<br>(कालावधी : ऑगस्ट ते मार्च – ८ ते ९ महिने) |
| ११ | संपर्क कार्यालयाचे नाव व पत्ता | उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, ससून सर्वोपचार रुग्णालयाजवळ, पुणे स्टेशन, पुणे -४११ ००१. |